# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २३/१०/२०२३

➢ चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| ०१ | पो स्टे गाडगे नगर अमरावती अप क्र १२९७/२३ कलम ३७९ भादवि | राधानगर गल्ली नं २ अमरावती | दि.१९-१०-२३ चे १२-२० वा<br><br>दि.२२.१०.२०२३ चे २०.५९ वा | श्यामसुंदर मनोहरराव बेलसरे वय ५२ वर्ष रा राधानगर गल्ली नं २ अमरावती | अनोळखी इसम | हकिकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व स्थळी यातील फिर्यादी हा त्याचा सॅमसंग ए ३०५ ब्लाक जुना वापरता किंमत अंदाजे ५००० रु चा चार्जिगला लावुन बाहेर गेला व परत आल्यावर बघितले असता मोबाईल दिसुन आला नाही बाजुचेघराचे सीसीटीव्ही चेक केला असता एक अनोळखी इसम हा मोबाईल घेवुन जातांना दिसला तसेच त्या शेजारच्या घरुन चारचाकी वाहनाची चाबी नेल्याचे दिसत आहे. अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद. |

➢ अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | पो.स्टे. वलगांव 358/23 | दर्यापुर फाट्या | दि 22/10/20 | अंकित संतोष लांडगे वय 23 | प्रदिप आसाराम सिंह जाधव वय | समक्ष पोलिस स्टेशन वलगांव येथे येवून जबानी रिपोर्ट देते की वरिल दिल्या पत्यावर राहते व अमरावती येथे फार्मशीस्ट म्हणून काम करतो.आज दि.22/10/2023 रोजी सकाळी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कलम 279,337, 338, भा.द.वी.प्रमाणे दाखल | वलगाव | 23 चे 13/00वा दरम्यान दि 22/10/20 23 चे 19/32 वा | वर्ष व्यवसाय – फार्मशीस्ट रा. रा. अकोला, लहान उंमरी महादेव मंदीर जवळ, ता.जि.अकोला | अंदाजे 55 वर्ष रा. पदम सौरभ कॉलनी अमरावती | 11.00 वा. मी व माझे सोबत माझे मित्र योगेश देशमूख, जय गिलबीले, अविनाश कावळे व शुभम भगत असे आम्ही योगेश देशमूख यांची स्विफ्ट डिझायर गाडी क्र. MH30-AZ-0648 ने अमरावती येथे अंबादेवी दर्शनाला निघालो. कार योगेश देशमूख हा चालवीत होता. दुपारी 01.00 वा. दरम्यान आम्ही वलगांव गावाचे जवळ पोहचलो होतो. आमचे समोर एक मोटार सायकल डबल सिट चालत होती. तेवढ्या एक नेव्ही ब्ल्यु रंगाची कार अमरावती कडून भरधाव वेगाने आली. ती महामंडळाचे बस ला ओहरटेक करीत असतांना तीने आमचे समोर चालत असना-या मोटार सायकलला जोरात धडक दिली. मोटार सायकल वरिल दोन्ही इसम हे रोडचे खाली फेकल्या गेले. त्या नंतर त्याने आमचे कारला ड्रायव्हर साईडला जोरात धडक मारली. त्यामुळे आमची गाडी यु टर्न झाली. ती धडक मारनारी कार सुध्दा यु टर्न झाली. आम्हाला कोनाला मार लागला नाही. आम्ही सर्व गाडीचे खाली उतरलो. मोटार सायकल वरीर दोन्ही इसम हे रोडचे बाजूला पडले होते. ते येवदा ता.दर्यापूर येथील अंकूश साकुरे व अनिकेत साकुरे असल्याचे ते सांगत होते. दोघांचे उजव्या पायाला जबर मार लागला होता. त्यांची मोटार सायकल होंडा शाईन क्र. MH27-CS-0114 असा होता. आमचे कारला धडक मारना-या कारचा नंबर MH27-DL-1219 असा आहे. त्या कारवर प्रदिप आसाराम सिंह जाधव वय अंदाजे 55 वर्ष रा. पदम सौरभ कॉलन अमरावती हा चालक होता. अपघातामध्ये आमची कार ड्रायव्हर साईडचे बॉयनेट चपकले असून टायर फुटला आहे. कारचे जवळपास एक लाख रूपयाचे नुकसान झाले आहे. मोटार सायकल वरिल दोन्ही जखमींना जमलेले लोग उपचारा कामी अमरावती येथे घेवून गेले. प्रदिप आसाराम सिंह जाधव वय अंदाजे 55 वर्ष रा. पदम सौरभ कॉलन अमरावती याने त्याची इग्रिस कार क्र. MH27-DL-1219 ही भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवून मोटार सायकल होंडा शाईन क्र. MH27-CS-0114 व आमची कार स्विफ्ट डिझायर क्र. MH30-AZ-0648 हीचा अपघात घडवून आनला. त्यामध्ये आमचे कारचे नुकसान झाले व होंडा शाईन वरील दोन्ही इसम हे गंभीर जखमी झाले आहेत. म्हणून त्यांचे विरूध्द कार्यवाही होण्या करीता रिपोर्ट देत आहे. |

➢ ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ७ | १० |
| २ | फ्रेजरपुरा अप क्रं ९०२/२०२३ कलम ४,२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५,१४२ महा. पोलीस कायदा | पंचशील नगर अमरावती | दि २२/१०/२०२३ चे २०/१५ वा. दि. २२/१०/२०२३ चे २२/२६ वा. | सरतर्फे पोहेकॉ योगेश श्रीवास बन १०१५ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | बिट्टु उर्फ रूपेश विनोद वानखडे वय २१ वर्ष रा. पंचशील नगर अमरावती | हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील नमुद फिर्यादी हे पो स्टे हददीत डी बी पथका सह पेट्रोलींग करीत असताना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक बातमी मिळाल्यावरून नमुद घ ता वेळी व ठिकानी जावुन पाहनी केली असता यातील नमुद आरोपी इसम हा बिट्टु उर्फ रूपेश विनोद वानखडे वय २१ वर्ष रा. पंचशील नगर अमरावती हा सार्वजनीक ठिकानी आपल्या हातामध्ये धारधार शस्त्र चाकु घेवुन रस्त्याने येणा.या लोकामध्ये दहशद निर्माण करित आहे नमुद इसम हा मा पोलीस उपायुक्त सा. परि. १ अमरावती यांचे आदेश क्रं पोउपआ/परि. ०१/तडीपार /७६/२०२३ दि. १२/०१/२०२३ अन्वये अमरावती जिल्हातुन १ वर्षाकरिता हददपार करण्यात आलेला आहे सदर आरोपीस त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव गाव बिट्टु उर्फ रूपेश विनोद वानखडे वय २१ वर्ष रा. पंचशील नगर अमरावती असे सांगितले सदर आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी पात्याचा धरधार शस्त्र चाकु कि २५०/रु पंचासमक्ष जप्ती पंचनाम्या प्रमाने जप्त करण्यात आला नमुद आरोपी याने मा पो आ सा अमरावती शहरात जारी कलम ३७ **(1)(3)** मपोका चे उल्लंघन करुन हातामध्ये धारधर शस्त्र चाकु घेवुन लोकामध्ये दहशत निर्मान करित असतांना मिळुन आला वरुन त्याचे विरुध्द कलम कलम ४,२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५,१४२ महा.पोलीस कायदा प्रमाने गुन्हा दाखल |
| ०४ | पो स्टे गाडगे नगर अमरावती अप क्र १२९८/२३ कलम ४२९ भादवि | मेघे ले आऊट वाडा रेस्टारेंट जवळ अमरावती | दि.२२-१०-२३ चे १७-३० वा दि.२२.१०.२०२३ चे २१-२८ वा | शेख हारुण शेख अजीम वय ४५ वर्ष रा राजपुत धाबा जवळ रिंग रोड अमरावती | अज्ञात | हकिकत याप्रमाणे आहे की नमुद घ ता वेळी व स्थळी यातील फिर्यादी हा त्यांची म्हैस चारण्यासाठी मागिल ५ ते १० वर्ष पासुन जातो दि.२२.१०.२०२३ रोजी दरवेळेप्रमाणे म्हैस चारण्यासाठी गेला असता अचानक शॉक सर्किट झाला त्यामुळे एक म्हैस मरण पावली त्याबाबत एमएसईबी कार्यालय नवसारी येथे सुदधा लेखी तक्रार दिली. अशा फि चे जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा नोंद |

➢ अकस्मात मृत्यु :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ४ | ५ | ६ | ८ |
| १. | पो.स्टे. भातकूली मर्गक्र 13/23 कलम 174 crpc | मयताचे राहतेघरी ग्राम आसरा | निलेश किसनराव गूडधे वय 32 वर्षे रा. ग्राम आसरा<br><br>घटनातावेळ – दि. 22/10/23 चे 16/00 वा. दरम्यान<br>दाखलतावेळ – दि. 22/10/23 चे 21/09 वा. | सरतर्फे पोहेकाँ राजेश बोरकूटे ब.नं. 871 पो.स्टे. भातकूली | हकीकत अश्या प्रकारे आहे की, पोहेकाँ राजेश बोरकूटे ब.नं. 871 पो.स्टे. भातकूली सोबत पोका आशिषबं.नं. 1512 असे डि.औ. ड्यूटी असताना पो.स्टे. ला फोनव्दारे माहीती मिळाली की, ग्राम आसरा येथे निलेश किसनराव गूडधे वय 32 वर्षे रा. ग्राम आसरा यांने आपले राहते घरी गळफास घेतला आहे अश्या माहीती वरून पोस्टाप सह ग्राम आसरा जाउन घटनास्थळाची पाहनी करून सचिन किसनराव गूडधे वय 35 वर्षे धंदा शेती यांनी जबानी दिली की, वर नमूद पत्यावर राहत असून मला दोन भाउ व एक बहीन असून सर्वाचे लग्न झाले आहे माझा लहान भाउ नामे निलेश किसनराव गूडधे वय 32 वर्षे हा माझ्या घराला लागून शेजारी त्याच्या कूटूबासह राहतो व मजूरीचे काम करतो निलेश याला अंदाजे 7-8 वर्षा पासून मानसिक रोगाचा त्रास असून ते मानसिक रोगी असल्याने त्याचेवर डॉंक्टर लक्ष्मीकांत राठी याच्या अमरावती येथील दवाखाण्यात उपचार सूरू आहे त्याचे त्रासामूळे त्याची पत्नी सौ.रूपाली निलेश गूडधे ही मूलाला घेउन एक महीन्यापूर्वी माहेरी हिरपूर ता मूर्तिजापूर येथे निघून गेली आजे दि. 22/10/23 रोजी मी सकाळी 08/00 वा मी दूसऱ्याच्या शेतात सोयाबीन काढायच्या कामाला गेलो असता दूपारी अंदाजे 04/00 वा. मला गावातून रितेश किसनराव थोरात यांनी फोन करून सांगीतले की, तूझा लहान भाउ निलू याने घरात फाशी घेतली आहे अशा माहीती मिळाली वरून मी घरी येउन पाहीले असता निलेशने त्याचे राहते घरी मागच्या खोलीत सिलिग फँनला साडीने फाशी घेतल्याचे दिसले काही वेळात पोलीस आले माझा लहान भाउ निलेश किसनराव गूडधे याने मानसिक आजारास कंटाळून गळफास घेउन आत्महत्या केली आहे अश्या मयताच्या मोठ्या भावाने दिलेल्या जबानी वरून व जिल्हा सामान्य रूग्नालय अमरावती येथून प्राप्त मरण्याच्या मेमो वरून मर्ग दाखल करून तपासात घेतला |

➢ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ६ | ७ | ८ | ९ | १० | १२ |
| | बडनेरा | अप क्र. ७५५/२३ कलम ६५(इ) म.दा.का. | पाच बंगला जुनी वस्ती बडनेरा | दि. २२/१०/२०३ चे १८/३० वी. | दि. २२/१०/२०२३ चे २०/१० वा. | सरतर्फे ना.पो.का. मंगेश परिमल, ब.न. ३३४ पो.स्टे. बडनेरा.अम. | सतिश मधुकराव येराणे वय ४२ वर्ष रा. माया नगर गोपाल नगर अमरावती. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीने पो.स्टाफ च्या मदतीने नमुद आरोपीवर प्रो. रेड केला असता त्याच्या ताब्यातुन अवैधरित्या विनापरवाना ११ नग देशी दारूबाँबी संत्रा च्या प्रत्येकी १८० ml च्या सिलबंद काचेच्या पावट्या, कि.अं. ६६०/- रू चा मुद्देमाल मिळुन आला. वरून सदर आरोपीवर सदरचा गुन्हा दाखल |